UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक ४२ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : ४२

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्राचार्य डॉ.लालसिंग खालसा ● प्रा.डॉ.किशोर वासुर्के ● प्रा.डॉ.गजेंद्र कढव

**❊ प्रकाशक ❊**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई–मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/–
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/–; सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ **आदिवासी स्त्रियांचा दर्जा आणि आरोग्य समस्येचे अध्ययन** - डॉ.सुषमा जाधव ------------ ५

२ **अंधश्रद्धा आणि आदिवासी महिलांचे सबलीकरण : एक सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोन.**
- डॉ.कविता मते ------------------------------------------ १०

३ **सदानंद देशमुख यांच्या बारोमास कांदबरीतील स्त्री चित्रण** - डॉ.प्रीती खोब्रागडे. ----------- १३

४ **आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या एक अध्ययन**
- डॉ.कौशल्या खिल्लारे. ---------------------------------------- १७

५ **आदिवासी महिलांच्या आरोग्य विषयक स्थितीचा एक सामाजिक दृष्टिकोन**
- डॉ.एस. के. बल्लोरे. ------------------------------------------ २०

६ **आदिवासी महिला सक्षमीकरण प्रश्न, आव्हाने आणि स्थिती**
- डॉ.कामराज रामटेके. ---------------------------------------- २५

७ **वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी गाडगेबाबा यांचे ग्रामीण स्त्री सक्षमीकरणातील योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन** - डॉ.अमोल ठाकरे. --------------------------- २९

८ **महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन**
- डॉ.सुप्रीया देसाई. ------------------------------------------ ३२

९ **साहित्यातील स्त्री आणि महिलासबलीकरण** - डॉ.ज्योती सूर्यवंशी. ------------------ ३५

१० **महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री** - डॉ.प्रमिला भुजाडे. ----------------------------- ३८

११ **Tribal Women in India: Issues, Challenges and Perspectives**
**- Dr. Gajendra Kadhav.** ------------------------------------- ४२

१२ **आदिवासी स्त्रियांची सामाजिक भूमिका** - डॉ.सौ.उज्वला मोकदम. ------------------ ४६

१३ **आदिवासी स्त्री आणि आदिवासींसाठी नवे राष्ट्रीय धोरण** - डॉ.नरेश धुर्वे. ---------------- ४९

१४ **आदिवासी महिलांचे सक्षमीकरण आणि वास्तव** - डॉ.सरला मेश्राम. ------------------ ५४

१५ **आदिवासी महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका** - डॉ.अनिता सार्वे. -------------- ५७

१६ **संत साहित्यातील स्त्री** - डॉ.स्वाती वाकोडे. ---------------------------------- ६२

१७ **Role of Library & Information Centres in Women Empowerment with the help of ICT**
**- 1) Dr.Kishor Wasurke; 2) Dr.Ramanik Lengure.** -------------------- ६६

१८ **महिला सक्षमीकरणात सार्वजनिक ग्रंथालयाची जबाबदारी** - डॉ.पौर्णिमा गंथडे. ----------- ७१

१९ **आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती** - डॉ.विलास चव्हाण. ------------- ७६

२० **स्त्रीवादी चळवळी आणि आदिवासी महिलांचे सक्षमीकरण** - प्रा.कल्पना गोडघाटे. --------- ७९

२१ **आदिवासी स्त्रियांच्या संदर्भात सरकारची भूमिका** - डॉ.बबीता थूल. ---------------- ८३

२२ **अस्थायी महिला गिरणी कामगाराच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन** - प्रा.प्रमोद वानखेडे. ------ ८७

२३ **आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात शैक्षणिक भूमिका –एक दृष्टिक्षेप** - डॉ.विठ्ठल चव्हाण. --- ९०

२४ **आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा व त्यांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन**
- प्रा.धर्मदास घोडेस्वार. --------------------------------------- ९३

# Tribal Women in India : Issues, Challenges and Perspectives

**Dr. Gajendra M. Kadhav**
Head, Dept. of Sociology
Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College, Armori.
Email : gajendrakadhav@gmail.com

**Abstract** :

Tribal Society is a primitive society of man. Most of the states are having the various types of tribal communities in India. According to George Peter Murdock, tribe is a social group in which many clans, nomadic bands, villages, or other sub-groups usually have a definite geographical area, a separate language, and a political organization or at least a feeling of common determination against strangers.

As defined in the Imperial Gazetteer of India, 'A tribe is a collection of families bearing a common name, speaking a common dialect, occupying or professing to occupy a common territory and is based on the need for protection blood relationship and on the strength of a common religion. The Tribe is a group of people having a common definite territory common dialect common name common religion in common culture they are they are united by blood relation magic and have a peculiar political organization.

**Key Words** :

Problems, facts, government, issues, development, planning etc.

**Introduction** :

The study of women development in the tribal communities is need of time. In the age of globalization still tribal women are facing multiple problems in current scenario. For development we have to have an approach, perspective and intention to solve the existing problems i.e., social, economic, familiar and cultural. Tribal women in India represent a diverse and culturally rich segment of the population. India is home to a significant number of tribal communities, often referred to as Adivasis, who inhabit various regions across the country. These communities have distinct languages, customs, traditions, and social structures, contributing to the country's cultural tapestry. Empowering tribal women in India involves addressing various social, economic, and cultural factors that impact their well-being and opportunities for advancement.

**Here are some key strategies for tribal women empowerment** :

1. **Education** : Providing access to quality education is essential for empowering tribal women. This includes both formal education and opportunities for skill development and vocational training. Education equips women with knowledge, skills, and confidence to participate more actively in their communities and the economy.
2. **Healthcare** : Ensuring access to healthcare services, including maternal and reproductive health services, is crucial for tribal women's well-being. Health programs should be culturally sensitive and accessible, considering the unique needs and challenges faced by tribal communities.
3. **Economic** : Empowerment: Promoting economic opportunities for tribal women through initiatives such as microfinance, entrepreneurship training, and support for income-generating activities can enhance their financial independence and improve household livelihoods. This can include promoting traditional crafts and artisanal skills as well as introducing new income-generating activities.
4. **Land and Property Rights** : Securing land and property rights for tribal women is important for their economic security and social status within their communities. Legal reforms and awareness campaigns are needed to ensure that women have equal rights to land ownership and inheritance.
5. **.Political Participation** : Encouraging tribal women's participation in local governance and

ISSN No. 2394-5990

decision-making processes can help amplify their voices and address issues that affect their communities. This includes promoting women's leadership roles in local councils, self-help groups, and community organizations.

6. **Legal Rights and Protection** : Ensuring that tribal women are aware of their legal rights and providing access to legal aid services can help protect them from exploitation, violence, and discrimination. Efforts should focus on addressing issues such as domestic violence, trafficking, and land rights violations.

7. **Cultural Preservation and Recognition**: Recognizing and preserving the cultural heritage of tribal communities, including traditional knowledge, languages, and customs, is important for tribal women's empowerment. Efforts to promote cultural pride and identity can strengthen their sense of belonging and self-worth.

8. **Awareness and Sensitization** : Conducting awareness campaigns and sensitization programs within tribal communities and among broader society can help challenge stereotypes, promote gender equality, and foster supportive environments for women's empowerment.

9. **Collaborative Partnerships** : Collaboration between government agencies, NGOs, civil society organizations, and local community leaders is essential for designing and implementing effective empowerment programs that address the specific needs of tribal women.

By addressing these various dimensions of empowerment, it's possible to create opportunities for tribal women to realize their full potential, contribute to their communities, and lead more fulfilling lives.

**Challenges of Tribal Women Empowerment** :

1) **Primary occupation** : Agriculture is the main occupation of tribal's. They have their own lifestyle and behavior.

2) **Common language** : Tribals have their language which helps them to communicate among themselves and this has been their bond which connects them and spread commonness in the community.

3) **Endogamous Group** : Endogamous group in which there is the practice of marrying within the group of their own people.

4) **Ties of blood relationship** : The blood relationship has really been a trademark in tribal society which ties the bound of family and people together. They celebrate their festivals together. Tribals give importance to their own family rather than others.

5) **Existence of Gotul** : It is one type of domination, social and cultural institute of tribals which provide overall information of various aspects of life.

6) **Political organization** : They have a typical political organization. Village and cast panchayats are the political systems in tribal community. Currently some tribal parts of India, panchayat raj system has been implemented as part of political systems.

7) **Importance of religion** : Religion is an important component which distinguishes the people from the other. They have their own festivals celebrations having various rituals, offerings.

8) **Common name** : They have their common name so that they can be distinguished among the other tribal groups.

**Problems of Tribal Society** :

1) **Backwardness** : The poverty of tribal society in terms of economic conditions is backward and raises many problems in tribal society.

2) **Illiteracy** : Tribal's are very long from education stream .old generation is fully illiterate, but some educational changes can be seen in today's generation.

3) **Naxalite problem** : it is a main problem of tribals in the current scenario. Development has almost stopped in this region due to the fear of Naxals.

4) **Lack of educational facilities** : Because of un-development, lack of attraction of government

and NGO'S education system has not been developed in tribal society.

5) **Bad habits** : Gambling, consumption of liquor etc. are the bad habits of tribal's

6) **Transport and communication problems** : Forest region, naxalism, complication, hills areas etc. obstacles are responsible for transport and communication problems.

7) **Custom and tradition** : There are many unusual and unnecessary traditions in tribal society which pull them into Vally of poverty.

8) **Lack of medical Facilities** : Availability of only traditional medical facilities.

9) **Exploitation of women** : The women are given secondary position in tribal society.

10) **Traditional mentality** : Tribals are so backward society, economically and politically and are not aware of modern things.

**Perspective of Tribal Women** :

The perspective of tribal women within Adivasi communities is multifaceted and shaped by various factors, including cultural traditions, socio-economic conditions, and gender dynamics. Here are some key aspects of their perspective.

**1. Traditional Roles Responsibilities** : In many Adivasi societies, women play crucial roles in maintaining the household, caring for children, and preserving cultural traditions. They often engage in activities such as agriculture, gathering forest resources, and artisanal crafts, contributing significantly to the household economy and community well-being.

**2. Gender Dynamics** : Adivasi communities, like many others, often have specific gender roles and power dynamics. While women may hold important positions within their communities, they can also face challenges related to gender inequality, limited access to resources, and decision-making processes. However, the extent of gender disparities varies among different Adivasi groups.

**3. Challenges & Vulnerabilities** : Tribal women may face unique challenges and vulnerabilities, including limited access to education, healthcare, and economic opportunities. They may also experience higher levels of poverty, malnutrition, and maternal mortality compared to non-tribal populations. Additionally, issues such as child marriage, domestic violence, and discrimination can affect their well-being.

**4. Intersectionality** : It's important to recognize that the experiences of tribal women are shaped not only by their gender but also by other intersecting factors such as ethnicity, socio-economic status, caste, and geographical location. Intersectional approaches are essential for understanding and addressing the diverse needs and realities of Tribal women.

**5. Agency and Resilience** : Despite facing various challenges, many tribal women demonstrate resilience, agency, and leadership within their communities. They often participate in grassroots movements, advocacy efforts, and community initiatives aimed at addressing issues such as land rights, environmental conservation, and social justice. Their contributions are essential for advancing the rights and well-being of Adivasi communities as a whole.

Overall, the perspective of tribal women within Adivasi communities is characterized by a complex interplay of cultural traditions, socio-economic conditions, and gender dynamics. Empowering tribal women involves recognizing their agency, addressing gender disparities, and promoting their rights to education, healthcare, and economic opportunities while respecting their cultural identities and traditions.

**Measures on Tribal Women Empowerment**:

1. The literacy rate among tribal women should be increased. For that, education should be made compulsory for all girls in the age group of 6 to 14 years in tribal society.
2. Women should be given the same tools as men for the empowerment of all tribal women. Also the problems faced by women for development should be removed.
3. Tribal women should be given various vocational education and training to empower them in

entrepreneurship.

4. A market should be made available for sale of goods produced by tribal women.

**Conclusion** :

It is important for government agencies, non-governmental organizations (NGOs), and civil society to collaborate in implementing these measures to combat the exploitation faced by the tribes. By addressing these issues, it is possible to improve the overall well-being and quality of life for the tribal people while respecting their cultural identity and rights. Today the Government of India is implementing many schemes for the empowerment of tribal women. These schemes will certainly empower tribal women in the future.

**References** :


1. Joshi, V. (1998). Tribal Situation in India: issues in development. New Delhi: Rawat Publications.
2. Khan,Y. A. (2000). Tribal life in India. Jaipur, SMS Highway: RBSA Publications.
3. Majumdar, D. N. (1961). Races and Cultures of India. Bombay: Asia Publishing House.
4. Nimbarte, G.N. , The social problems in India Sankalp Publication Nagpur.
5. Singh, A. K. (2008). Tribal Development in India. New Delhi: Serials Publications.
6. Soundarapandian, M. (2001). Tribal Development in India. New Delhi: Anmol Publications Pvt.Ltd.
7. Thakur, D. (1986). Socio- Economic Development of Tribes in India. New Delhi: Deep & Deep Publications.
8. Verma, V. (2012). Lahaul: A Tribal Habitat in Himachal Pradesh. Delhi: B.R. Publishing Corporation.
9. Vidyarthi, L. P., & Rai, B. K. (1985). The Tribal culture of India. New Delhi: Concept Publishing Company.

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥


## पुरवणी अंक ४२ - मार्च २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : ४२



**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्राचार्य डॉ.लालसिंग खालसा ● प्रा.डॉ.किशोर वासुर्के ● प्रा.डॉ.गजेंद्र कढव



**✲ प्रकाशक ✲**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई-मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-; सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.


टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ **आदिवासी स्त्रियांचा दर्जा आणि आरोग्य समस्येचे अध्ययन** - डॉ.सुषमा जाधव ------------ ५

२ **अंधश्रद्धा आणि आदिवासी महिलांचे सबलीकरण : एक सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोन.**
- डॉ.कविता मते ---------------------------------------------- १०

३ **सदानंद देशमुख यांच्या बारोमास कांदबरीतील स्त्री चित्रण** - डॉ.प्रीती खोब्रागडे. ----------- १३

४ **आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या एक अध्ययन**
- डॉ.कौशल्या खिल्लारे. ------------------------------------- १७

५ **आदिवासी महिलांच्या आरोग्य विषयक स्थितीचा एक सामाजिक दृष्टिकोन**
- डॉ.एस. के. बल्लोरे. ------------------------------------- २०

६ **आदिवासी महिला सक्षमीकरण प्रश्न, आव्हाने आणि स्थिती**
- डॉ.कामराज रामटेके. ------------------------------------- २५

७ **वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी गाडगेबाबा यांचे ग्रामीण स्त्री सक्षमीकरणातील योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन** - डॉ.अमोल ठाकरे. --------------------------- २९

८ **महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन**
- डॉ.सुप्रीया देसाई. --------------------------------------- ३२

९ **साहित्यातील स्त्री आणि महिलासबलीकरण** - डॉ.ज्योती सूर्यवंशी. ------------------- ३५

१० **महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री** - डॉ.प्रमिला भुजाडे. ---------------------------- ३८

११ **Tribal Women in India: Issues, Challenges and Perspectives**
**- Dr. Gajendra Kadhav.** ------------------------------------- ४२

१२ **आदिवासी स्त्रियांची सामाजिक भूमिका** - डॉ.सौ.उज्वला मोकदम. ------------------ ४६

१३ **आदिवासी स्त्री आणि आदिवासींसाठी नवे राष्ट्रीय धोरण** - डॉ.नरेश धुर्वे. ---------------- ४९

१४ **आदिवासी महिलांचे सक्षमीकरण आणि वास्तव** - डॉ.सरला मेश्राम. ----------------- ५४

१५ **आदिवासी महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका** - डॉ.अनिता सार्वे. -------------- ५७

१६ **संत साहित्यातील स्त्री** - डॉ.स्वाती वाकोडे. ---------------------------------- ६२

१७ **Role of Library & Information Centres in Women Empowerment with the help of ICT**
**- 1) Dr.Kishor Wasurke; 2) Dr.Ramanik Lengure.** -------------------- ६६

१८ **महिला सक्षमीकरणात सार्वजनिक ग्रंथालयाची जबाबदारी** - डॉ.पौर्णिमा गंथडे. ----------- ७१

१९ **आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती** - डॉ.विलास चव्हाण. ------------- ७६

२० **स्त्रीवादी चळवळी आणि आदिवासी महिलांचे सक्षमीकरण** - प्रा.कल्पना गोडघाटे. --------- ७९

२१ **आदिवासी स्त्रियांच्या संदर्भात सरकारची भूमिका** - डॉ.बबीता थूल. ---------------- ८३

२२ **अस्थायी महिला गिरणी कामगाराच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन** - प्रा.प्रमोद वानखेडे. ------ ८७

२३ **आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात शैक्षणिक भूमिका –एक दृष्टिक्षेप** - डॉ.विठ्ठल चव्हाण. --- ९०

२४ **आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा व त्यांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन**
- प्रा.धर्मदास घोडेस्वार. ------------------------------------ ९३

२५ **वारकरी पंथातील स्त्री संत आणि संत तुकारामांच्या साहित्यातील स्त्री**
– डॉ.श्रीकांत पानघाटे. ---------------------------------------- ९७

२६ **भारतातील आदिवासी महिलांचे सक्षमीकरण** – प्रा.लामेश बावनकुळे. --------------- १००

२७ **ब्रिटीश वसाहतवाद व भारतीय आदिवासी महिला** – प्रा.संजय गिरडकर. ------------- १०३

२८ **हलबा जमातीचे संत श्री काशिनाथ महाराज अवतार कार्य**– प्रा.महेंद्र कुंभारे.------------ १०८

२९ **राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्रीविषयक विचार** – डॉ.विजय रैवतकर. ---------------- ११२

३० **कर्करोग आणि स्त्रियांचे मानसिक आरोग्य एक आढावा**
– १) विभावरी नखाते, २) डॉ.उषा खंडाळे. ------------------------------ ११६

३१ **महिला समुपदेशन केंद्र आणि महिला** – १) प्रा.इंदू साळुंखे; २) प्रा.डॉ.वेदप्रकाश मलवाडे. -- ११९

३२ **आदिवासी महिला सक्षमीकरणात पंचायतराजची भूमिका**
– १) श्री. संतोष चलाख; २) प्रा. डॉ. सौ. अभय लाकडे. --------------------- १२४

३३ **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कादंबरीवर पडलेला प्रभाव**
– १) श्री. पिराजी कांदे; २) डॉ. गजानन कोर्तलवार. ----------------------- १२८

३४ **गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात गडचिरोली पोलीस प्रशासनाचे योगदान**
– १) श्री. आशिष येल्लेवार; २) प्रा. डॉ. पंढरी वाघ. ----------------------- १३१

३५ **नागभीड तालुक्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील स्त्रियांचे पोषण व आरोग्य – एक अध्ययन**
– १) वैशाली वासेकर; २) प्रा.डॉ.माधुरी कोकोडे. ------------------------- १३५

३६ **उषाकिरण आत्राम यांच्या 'शिकार फत्ते झाली' या कथासंग्रहातील आदिवासींचे वास्तव दर्शन**
– १) कु.बारू उईके; २) प्रा.डॉ. नरेंद्र आरेकर. --------------------------- १४०

३७ **अरुणा सबाने यांच्या 'विमुक्ता' कादंबरीतील समाज वास्तव**
– १) कु. निशा कापकर, २) प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर. ------------------------ १४३

३८ **भटक्या बहुरूपी जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणातील समस्या**
– १) कु.प्रिती नैताम, २) प्रा.डॉ.स्निग्धा कांबळे. -------------------------- १४६

३९ **वर्धा जिल्ह्यातील पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई करिता केलेल्या दाव्याबाबत प्रतिक्रियांचे चिकित्सक अध्ययन** – १) सपना गजभिये; २) डॉ. श्री. पराग कावळे ------- १५०

४० **गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोककला संस्कृती – समाजशास्त्रीय अध्ययन**
– १) कु. जयाबाई मडावी, २) प्रा. डॉ. अभय लाकडे.---------------------- १५४

४१ **तिसऱ्या जगाच्या विजेत्या: इंदिरा गांधी आणि १९८३ ची NAM परिषद**
– १) शार्दूल अडबाले; २) प्रा. डॉ. संजय गोरे ---------------------------- १५८

४२ **अण्णाभाऊ साठे यांच्या कथेमधील विद्रोही स्त्रीपात्र**
– १) सतिष डांगे; २) प्रा.डॉ.पद्माकर वानखेडे.---------------------------- १६२

४३ **बहुरूपी लोककला आणि संस्कृती** – १) भूमेश्वर शेंडे; २) प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर. ------- १६६

४४ **विर जातीतील महिला सशक्तीकरणासाठी शासकीय योजना**
– १) सचिन खेडकर; २) प्रा. डॉ. गजेंद्र कढव ---------------------------- १७०

४५ **स्त्री समाजसेविकांच्या आत्मचरित्रातील आदिवासी स्त्री**
– १) कु.भारती गेडाम; २) डॉ.विलास खुणे. ----------------------------- १७४

# विर जातीतील महिला सशक्तीकरणासाठी शासकीय योजना

**श्री सचिन पंढरी खेडकर**
संशोधक विद्यार्थी
महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.एन.पी. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी.
**डॉ. गजेंद्र माणिक कढव**
मार्गदर्शक
समाजशास्त्र विभागप्रमुख
महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.एन.पी. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

**सारांश :**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने कल्याणकारी राज्याचे धोरण स्वीकारले. जर भारताच्या विकास करायचा असेल तर सर्वप्रथम महिलांचा विकास करणे आवश्यक आहे. असा विचार स्वीकारल्यामुळे सुरवातीपासूनच देशातील अनेक जाती-जमातीतील महिलांसाठी वेगवेळ्या योजना शासनांनी कार्यान्वित केल्या. विर जातीतील महिलांसाठी सुद्धा विविध योजना शासनाने राबविल्या आहेत, परंतु विर जातीतील महिलांसाठी अनेक कागदोपत्री योजना असल्या तरी या योजना या घटकापर्यंत पोहचल्या नाहीत. त्या कारणांमुळे विर जातीतील महिलांचे अपेक्षित असे सशक्तीकरण झाले नसल्याचे दिसून येते. विमुक्त व भटक्या विर जाती व तत्सम लोकांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी ज्या योजना आहेत त्यामुळे आर्थिक प्रश्न सोडविता येणे शक्य आहे. लाभार्थी या योजनाचा वापर दैनदिन गरजा भागविण्यासाठी करतात हा अनुभव आहे. त्यामुळे या समाजासाठी भरीव व कृतीशील कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

केंद्र सरकारच्या इतर मागासवर्गीय यादीत विमुक्त व भटक्यांचा जातींचा समावेश आहे. परंतु विमुक्त व भटके इतर मागासवर्गीय पातळीवर नाहीत. आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय (जइउ) पुढारलेले आहेत. त्यामुळे या योजना या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहचत नाहीत. केंद्र सरकारच्या इतर मागासवर्गीय यादीत विमुक्त व भटक्या प्रवर्गातील विर जातीतील महिलांसाठी विशेष तरतूद केल्यास महिलांचे सशक्तीकरण प्रभावीपणे होईल.

**किवर्ड :**

विर, विमुक्त व भटके इतर मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, सशक्तीकरण, भोई, हिंदू कोड बिल, आत्मविश्वास, स्वावलंबी, आत्मनिर्भर इ.

**प्रस्तावना :**

कोणत्याही समाजाची सामाजिक स्थिती कशी आहे हे त्या समाजातील महिलांच्या स्थितीवरून समजून येते. स्त्री शिवाय घर, कुटुंब आणि समाजाची कल्पनाच करता येत नाही. कारण कुटुंबात नवीन सदस्यांना जन्म देणे, मुलांचे संगोपन करणे, कुटुंब सांभाळणे असे अनेक महत्वाचे कार्य स्त्री करीत असते. भारतामध्ये जवळपास ५० टक्के लोकसंख्या ही महिलांची आहे. म्हणून जो पर्यंत भारतातील महिलांची स्थिती सुधारत नाही, महिला पूर्णपणे सक्षम होत नाही तो पर्यंत देशाचा विकास पूर्णपणे होणार नाही. कलम ३८ मध्ये विषमता नष्ट करणे, सर्वांना समान संधी देणे, वेगवेगळ्या पातळीवर जो समाज आहे त्या घटकांना एकत्र एका ठिकाणी आणणे या जबाबदाऱ्या शासनावर सोपविलेल्या आहेत. राज्यघटना लोकशाहीला महत्व देते, भटक्या जातीमधील विर जातीचा स्तर निकृष्ट मागासलेले असमान असतील तर समान संधीचे तत्व निरर्थक ठरेल. म्हणून घटनेत मार्गदर्शक तत्वानुसार महिलांना व मुलीना सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरून परिवर्तन करून समता प्रदान करणारी ती एक शक्ती आहे. त्यावर महिला सबलीकरण अवलंबून आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महिलांचे प्रश्न सुटले नाहीत. त्यातच भोई जमातीतील महिलांचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाही. महाराष्ट्र शासनाने १९६५ नंतर शासकीय सेवेत आरक्षण देऊन, समिती व शिफारस काढून सामाजिक विकास, भटक्या विमुक्तांची आर्थिक स्तिथी सुधारण्यासाठी भरीव व ठोस कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात महिलांच्या आर्थिक व एकूणच विकास करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. महिलांचा विकास म्हणजे कुटुंबाचा विकास होय. महिलांमधील आंतरिक भिती काढून आत्मविश्वास, स्वावलंबी, आत्मनिर्भर या क्षमता मिळवणे आवश्यक आहे. तर ती निर्भय होऊन हिंदू कोड बिल हे सुरक्षित बिल

म्हणून त्याची अंमलबजावणी होईल. महिला सशक्तीकरण संकल्पना सर्वप्रथम १९६० मध्ये अमेरिकेतील काळ्या गटाने मांडली. १९८५ मध्ये नौरोबी येथे आंतरराष्ट्रीय संमेलनातून स्त्री-पुरुष समतेचे तत्व सबलीकरणात आले. म्हणून ८ मार्च जागतिक महिला दिन म्हणून महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भारतात प्रयत्न झाले.

**उद्देश :**

१. विर जातीतील महिला सशक्तीकरणाच्या योजनेचा अभ्यास करणे.
२. विर जातीतील महिलांची सशक्तीकरणाची गती अभ्यासणे.
३. विर जातीतील महिला सशक्तीकरणासंदर्भातील शासकीय योजनांची फलश्रुती अभ्यासणे.

**गृहीकृत्य :**

१. विर जातीतील महिलांसाठी असलेल्या योजनांविषयी त्या जागृत नाही.
२. विर जातीतील महिलांच्या सशक्तीकरणाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचल्या नाहीत.
३. विर जातीतील महिला सशक्तीकरणासंदर्भातील शासकीय योजनांची फलश्रुती झालेली नाही.

**व्याख्या** : (सशक्तीकरण)

किरण देवेंद्र यांच्या मते स्त्री सबलीकरण किंवा महिला सशक्तीकरण याचा अर्थ स्त्री हि आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र स्वयंनिर्भर व स्वावलंबी असणे होय. स्वत:बद्दल सकारात्मक दृष्टीकोन असावा जेणेकरून कोणत्याही विपरीत परिस्थितीला सामोरे जाता येईल विकास कार्यात सहभागी होण्यास पात्र ठरेल निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल या करिता शिक्षण सबलीकरणासाठी एक महत्वपूर्ण भूमिका वाटणारा घटक आहे.

ईरावती कर्वे यांनी मराठी लोकांची संस्कृती या पुस्तकातून नमूद केल्याप्रमाणे यांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ असला तरी ते कुठेही अस्पृश्य नाहीत. व त्यांनी वाहलेले पाणी संपूर्ण जातींना चालते यावरून समजते कि, अलुतेदारापैकी विर' या अलुतेदाराला शारीरिक कष्टाची कामे करावी लागत असे. त्याचा मोबदल्यात त्याला जी मजुरी दिली जाते त्यावर त्यांचा उदरनिर्वाह केला जाई. पण इतराबरोबर सामाजिक संबंधात सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला. विर जातीचा व्यवसाय हा नद्या, तलाव, मासेमारी करणे, लाईटची व्यवस्था नसल्यामुळे मशाली धरणे, शिंगाडे विकणे, टरबूज विकणे, भाजीपाला विकणे, शिकार करणे, मुरमुरे चणे फुटाणे विकणे, वीट भटीवर वर काम करणे, बिबे फोडणे, मिठाई विकणे, मजुरी करणे व इ व्यवसाय करत असत.

यातुन 'विर' जातीतील महिलांचे वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय दिसून येतात. त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय विकासाच्या दृष्टीने सशक्तीकरण होणे आवश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ पासून वेगवेगळ्या योजना ग्रामीण लोकांपर्यंत पोहचलेल्या नाहीत त्यामुळे त्यांची प्रगती होताना दिसून येत नाही. भारतामध्ये खेड्याकडे चला हि मोहीम महात्मा गांधीनी राबवली होती. खेड्यात जो पर्यंत महिलांचा विकास होणार नाही तोपर्यंत भारत आर्थिक महासत्ताक बनू शकत नाही. त्यामुळे महिलांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे.

**व्याख्या** (योजना) :

भारतीय नियोजन मंडळाच्या मते, पंचवार्षिक योजनाच्या पद्धतीच्या सहाय्याने आर्थिक आणि सामाजिक जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु झाले, ती पद्धत योजना म्हणजे समाज विकास होय.

शासन व लोक यांच्या संघटीत प्रयत्नामुळे सर्व समाजाची सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय विकास कार्यक्रमात हातभार लावण्यासाठी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे समाज विकास योजना होय.

**महिला सशक्तीकरणासाठी शासकीय योजना :**

१) महिला समृद्धी कर्ज योजना
२) महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना
३) सुकन्या समृद्धी योजना
४) जननी सुरक्षा योजना
५) माझी कन्या भाग्यश्री योजना
६) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना
७) लेक लाडकी योजना

**१) महिला समृद्धी कर्ज योजना :**

महिला समृद्धी कर्ज योजनेंतर्गत महिलांना स्वत:चा उद्योग करण्यासाठी ५ लाख ते २० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या योजनेमध्ये कर्जाचा व्याजदर हा ४ टक्के आहे. तसेच या योजनेची परतफेडेचा कालावधी हा तीन वर्षे आहे.

**२) महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना :**

या योजनेंतर्गत विधवा महिलांना सरकार दरमहा ६०० रुपये दिले जातात. जर एखाद्या महिलेला मुले असतील तर

तिला दरमहा ९०० रुपये दिले जातील. जेणेकरून ती आपल्या मुलाची सहज काळजी घेऊ शकेल.

**३) सुकन्या समृद्धी योजना :**

सुकन्या समृद्धी योजनेचा उद्देश मुलीना शैक्षणिक क्षेत्रात पुढे करून त्यांच्या लग्नात कुठलीच कमतरता येऊ न देणे आहे. या योजनेंतर्गत मुलीच्या नावे कमीत कमी २५० रुपयांनी बँकेत खाते उघडू शकतात. व मुलीच्या २१ व्या वर्षी ८.५ टक्के व्याजदराने रक्कम परतफेड होईल. मुलीची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ५० टक्के रक्कम काढता येईल.

**४) जननी सुरक्षा योजना :**

या योजनेद्वारे देशातील गरोदर महिला आणि नवजात बालकांची स्तिथी सुधारेल. व गरोदर महिलांना प्रसुतीच्या वेळेस सरकारकडून मोफत प्रसूती व १४०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते.

**५) माझी कन्या भाग्यश्री योजना :**

या योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकार मुलीच्या जन्मानंतर ५०,००० रुपये देते. माझी कन्या भाग्यश्री योजना एप्रिल २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाने सुरु केली होती. दोन मुली असलेल्या कुटुंबालाही या योजनेचा लाभ घेता येईल.

**६) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :**

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना (PMMVY) हि केंद्र सरकारची योजना आहे. जी महिला आणि बाल विकास मंत्रालय व समाज कल्याण विभागामार्फत राबवली जाते. महिलांना हप्त्यामध्ये मदत दिली जाते. जर पत्र महिला जननी सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थी असेल तर तिला अतिरिक्त १००० रुपये म्हणजेच ६००० रुपये दिले जातात.

**७) लेक लाडकी योजना :**

लेक लाडकी योजनेंतर्गत महाराष्ट्रातील सर्व गरीब मुलीना शिक्षणाची सुवर्ण संधी मिळणार आहे. चांगले शिक्षण मिळाल्याने गरीब मुलीलाही रोजगाराच्या नवीन संधी मिळणार आहेत. या योजनेंतर्गत मुलीच्या जन्माच्या वेळेस ५००० रुपये दिले जातील. जेव्हा मुलगी पहिल्या वर्गात प्रवेश घेते तेव्हा तिला ६००० रुपयाची रक्कम दिली जाईल. व समोरही तिच्या विवाहापर्यंत टप्प्यानुसार लाभ दिला जाईल.

विर जातीतील महिलांनी समाज विकास योजनाच्या द्वारे पारंपारिक जीवन पद्धती सोडून नवीन पुरोगामी जीवनपद्धतीचा अंगीकार करणे होय. महिलांनी या योजनेद्वारे समाजाच्या प्रेरणेने आणि महिलांच्या सहकार्यांनी महिलांचेच जीवनमान उंचावणे, ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवन बदलविण्यासाठी आणि महिलांची जडणघडण करण्यासाठी विर जातीतील महिलांसाठी समाज विकास योजना अत्यंत महत्वाच्या आहेत. विर जातीतील महिला समाज विकास योजनेमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्व विर जातीतील लोकांचा विकास होईल.

**ध्येय :**

१) समाज परिवर्तनासाठी योजना असावी आणि त्यात सर्व विर जातीतील महिलांचा सहभाग म्हणजे सामुहिक प्रयत्न असायला हवे.

२) विर जातीतील महिलांच्या पराठ, रूढी, परंपरा इ. चा प्रभाव असतो. त्यांच्या प्रवृतीमध्ये आणि सवयीत बदल करून आणणे आवश्यक आहे.

३) समाज विकास योजनेद्वारे सामाजिक प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

४) समाज विकास योजनेद्वारे समाजाचा पोषक अशा गुणांचा विकास करणे. सामुहिक प्रयत्न स्वयंप्रेरणा, सहयोग, स्वावलंब, सामाजिक जबाबदारी, नेतृत्व, विश्वास, शिक्षण क्षमता इ. गुणांचा विकास होणे आवश्यक आहे.

५) विर जातीतील महिलांचे व्यवसाय कौशल्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, कार्यशाळा इ. साधनांचा वापर करावा जेन्कारुने विर जातीतील महिलांचे सशक्तीकरण होईल.

**निष्कर्ष :**

१. आधुनिक काळातील सर्वच समाजातील स्त्रिया झपाट्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असले तरी विर जातीतील महिलांना शिक्षण आणि प्रभावी नेतृत्वाचा अभावामुळे त्यांना शासकीय योजनांची माहिती नाही. त्यामुळे शासकीय योजनांची फलश्रुती पूर्णपणे झालेली दिसून येत नाही.

२. विर जातीतील महिलांना शासकीय योजनांविषयी जाणीव जागृती नसल्यामुळे विर जातीतील महिलांची सशक्तीकरणाची गती कमी असल्याचे दिसून येते.

३. विर जातीतील महिला सशक्तीकरणासंदर्भातील शासकीय योजनांच्या लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या नगण्य आहे.

४. वृद्ध महिलासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या वृद्ध लाभार्थ्यांची संख्या देखील विर जातीतील वृद्ध महिलांमध्ये कमी असल्याचे दिसून येते.

५. विर जातीतील महिलांसाठी असलेल्या योजनांविषयी त्या जागृत नसल्याचे दिसून येते.

६. विर जातीतील महिलांच्या सशक्तीकरणाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचल्या दिसून येत नाही.

**संदर्भ :**

१. देशमुख सुदर्शन, (२००७) 'आदिवासी समाजाचे दारिद्र्य', निर्मलन प्रकाशन, नांदेड.

२. चव्हाण रामनाथ, (१९८९) जाती जमाती, मेहता पब्लिकेशन्स हाउस, पुणे.

३. लोटे रा.ज.,(२००४), 'भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या', पिंपळपुरे पब्लिशर्स, नागपूर.

४. सरकुंडे माधव,(२०११), 'आदिवासी अस्मितेचा शोध', देवयानी प्रकाशन, लातूर.

५. साने गीता,(२०१७), 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशन, मुंबई.

६. भारतीय समाज मे स्त्रियो कि परिस्थिती, राष्ट्रीय रिपोर्ट, १९७१-१९७४ आलाईड पब्लिकेशन्स.

७. www.mr.vikaspedia.in

८. shodhganga.inflibnet.nc.in